मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीत सात सात पिस्तुले जप्त; पोलिसांची मोठी कारवाई!

## मनाई आदेश असतानाही बेकायदेशीर शस्त्रसाठा; गुन्हे शाखेच्या गुंडा विरोधी पथकाची धडक कारवाई

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मनाई आदेश लागू असतानाही बेकायदेशीर पिस्तूल बाळगणाऱ्या आरोपींवर गुन्हे शाखेच्या गुंडा विरोधी पथकाने कारवाई केली आहे. वेगवेगळ्या तीन ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत सहा पिस्तूल जप्त करण्यात आली आहेत. तसेच गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने एक पिस्तूल हस्तगत केले आहे. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




ताथवडे येथील वळुमाता डेअरी फॉर्मजवळ गुंडा विरोधी पथकाने कारवाई करत समीर लक्ष्मण इजगज (वय २७, रा. मारुंजी, पुणे) याला अटक केली. त्याच्याकडून एक लाख दोन हजार रुपये किंमतीची दोन देशी बनावटीची पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात सहायक पोलीस उपनिरीक्षक विक्रम हंबीरराव जगदाळे यांनी फिर्याद दिली आहे.

काळेवाडीत तरुणास अटक काळेवाडी परिसरातील नढे कॉर्नरजवळ गुरुवारी (११ डिसेंबर) गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत रोहित महादेव आगरखेड (वय २२, रा. पवनानगर, काळेवाडी) याला अटक केली. त्याच्याकडे ५० हजार ५०० रुपये किंमतीचे विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल व एक राऊंड आढळून आला. गुन्हे शाखेच्या युनिट एकमधील पोलीस हवालदार सागर दशरथ अवसरे यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मजुराकडून पिस्तूल जप्त शुक्रवारी मध्यरात्री आळंदी-मरकळ रोडवरील चौकात कारवाई करत धर्मेंद्र हरिप्रसाद सैन (वय २५, रा. खेड, पुणे) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. या प्रकरणी गुंडा विरोधी पथकातील पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर विष्णूबुवा गिरी यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### चिखलीत चार पिस्तुले जप्त

» चिखलीतील सोनवणे वस्ती परिसरात गुंडा विरोधी पथकाने कारवाई केली. यामध्ये ओमकार सिद्धेश्वर बंडगर (वय २१), अभय विकास सुरवसे (वय २७, तडीपार), सुहास उर्फ पिल्या बालाजी गायकवाड (वय २७), या तिघांना अटक केली. आरोपींकडून चार पिस्टले व तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. मनाई आदेशासह तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. गुंडा विरोधी पथकातील सहायक पोलीस उपनिरीक्षक अमित पोपट गायकवाड यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# "पीएमआरडीए"कडून भूखंडांचा ई-लिलाव जाहीर..!

## पुणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवडमध्ये 30 महत्त्वाचे भूखंड 80 वर्षांच्या भाडेपट्ट्यावर उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनीधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) महानगराच्या विकासाला ऐतिहासिक गती देण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. पीएमआरडीएच्या मालकीचे असलेले पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच पुणे ग्रामीण हद्दीतील विविध उपयोगांचे एकूण ३० भूखंड प्रथमच ८० वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यावर ऑनलाइन ई-लिलाव पद्धतीने वाटपासाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

Pune Metropolitan Region Development Authority

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भूखंडांमध्ये तीन शैक्षणिक वापराचे भूखंड, नऊ वाणिज्य व सार्वजनिक सुविधा भूखंड, एक वैद्यकीय वापराचा भूखंड, एक सार्वजनिक सुविधा (लायब्ररी/संगीत शाळा) भूखंड आणि एक फॅसिलिटी सेंटर भूखंड यांचा समावेश आहे. याशिवाय, पुणे ग्रामीण हद्दीतील १४ सुविधा भूखंड (AMENITY SPACE) तसेच भांबुर्डा (शिवाजीनगर) येथील एक वाणिज्य भूखंडदेखील या ई-लिलावाचा भाग आहेत. या भूखंडांचे वाटप पात्र आणि इच्छुक व्यक्ती अथवा संस्थांना ई-लिलावाद्वारे केले जाणार आहे. या ई-लिलाव प्रक्रियेच्या अटी व शर्तींची सविस्तर माहिती HTTPS://EAUCTION.GOV.IN आणि पीएमआरडीएचे अधिकृत संकेतस्थळ WWW.PMRDA.GOV.IN वर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी पुणे महानगराच्या विकासाला हातभार लावण्यासाठी जास्तीत जास्त इच्छुक व्यक्ती आणि संस्थांनी या ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### प्रमुख तारखा आणि प्रक्रिया:

» नोंदणी व कागदपत्रे डाऊनलोड करण्याची मुदत: दि. १५ डिसेंबर २०२५, सकाळी १०.०० वाजेपासून ते दि. १३ जानेवारी २०२६, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत इच्छुक व्यक्ती आणि संस्थांना https://eauction.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी आणि निविदा प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

» तांत्रिक बोलीदारांची घोषणा: तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या बोलीदारांची घोषणा दि. २२ जानेवारी २०२६ रोजी केली जाईल.

» लाईव्ह ई-लिलाव (Live Auction): अंतिम ई-लिलाव प्रक्रिया दि. २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सुरू होईल.

# किसन तापकीरसह सहा जणांच्या टोळीवर मोक्का!

## चालू वर्षात 35 गुन्हेगारी टोळ्यांमधील 179 गुन्हेगारांवर मोकाची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

चऱ्होली येथे व्यावसायिकाच्या डोक्यात गोळ्या घालून ठार केल्याच्या गुन्ह्यात फरार असलेला आरोपी माजी नगरसेवक किसन तापकीरसह सहा जणांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या टोळीसह चिखली मधील अनिरुद्ध जाधव, एमआयडीसी भोसरी मधील राहुल लोहार, दिघी मधील विक्रांत देवकुळे या टोळ्यांवर देखील मोकाची कारवाई केली आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी चालू वर्षात ३५ गुन्हेगारी टोळ्यांमधील १७९ गुन्हेगारांवर मोकाची कारवाई केली आहे.



आर्थिक वादातून नितीन गिलबिले या व्यावसायिकाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. यामध्ये पोलिसांनी पाच जणांना अटक केली. तर सातवा साथीदार माजी नगरसेवक किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर हा फरार आहे. तोच या गुन्ह्याचा मास्टर माईंड असल्याचे सांगितले जात आहे. दिघी पोलिसांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार या सात जणांच्या टोळीवर मोका अंतर्गत कारवाई करण्यात आली असून यातील आरोपींवर सात गंभीर गुन्हे दाखल आहेत. टोळी प्रमुख अमित जीवन पठारे (३३, चऱ्होली बुद्रुक), विक्रांत सुरेश ठाकूर (३८, सोळू, खेड), सुमित फुलचंद पटेल (३१, दिघी), आकाश सोमनाथ पाठारे (२३, चऱ्होली बुद्रुक), सोमनाथ प्रकाश पाटोळे (२४, सोळू, खेड), किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर (चऱ्होली बुद्रुक) अशी कारवाई झालेल्या टोळीची नावे आहेत.

दिघी पोलिसांनी आणखी एका टोळीवर मोकाचा प्रस्ताव पाठवला. टोळी प्रमुख विक्रांत उर्फ सरडा प्रकाश देवकुळे (२४), सुरज राजू चव्हाण (२०), साहिल उर्फ विश्वास मुकेश लोट (१९), शुभम सुमित डिंगीया (२४, सर्व रा. बोपखेल) या टोळीवर एकूण सात गंभीर गुन्हे दाखल आहेत. दिघी पोलिसांनी मोकाचा पाठवलेला प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून विक्रांत देवकुळे टोळीवर देखील कारवाई झाली आहे.

चिखली परिसरातील सराईत गुन्हेगार अनिरुद्ध उर्फ बाळ्या उर्फ विकी राजू जाधव याच्या टोळीवर देखील मोका लावण्यात आला आहे. टोळी प्रमुख विकी जाधव याच्यासह सोहन राजू चंदेलिया (२३, रावेत), प्रद्युमन राजकुमार जवळगे (२५, चाकण), यश उर्फ गोंद्या आकाश खंडागळे (२१, निगडी), अभिषेक उर्फ बकासुर चिमाजी पवार (२२, चिंचवड), शुभम गोरखनाथ चव्हाण (३०, आकुर्डी), अनिकेत अशोक बाराथे (२७, दापोडी), अश्विन सुधीर गायकवाड (२१, दापोडी), यशपालसिंग अरविंद सिंग देवडा (१९, सांगवी) आणि पाच अल्पवयीन मुलांच्या विरोधात कारवाई झाली आहे. या टोळीतील सदस्यांवर तब्बल १५ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

एमआयडीसी भोसरी परिसरातील सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख राहुल अप्पासाहेब लोहार (२७, उरुळी कांचन), टोळीतील सदस्य हतिक प्रकाश गायकवाड (२४, चाकण), आकाश दिनकर गायकवाड (२४, मोशी), गणेश बबन वहिले (२३, डुडुळगाव, पुणे), शिवतेज ज्ञानेश्वर ठाकरे (२४, डुडुळगाव) यांच्या विरोधात १० गंभीर गुन्हे दाखल आहेत. या टोळीवर देखील मोकाची कारवाई करण्यात आली आहे.

मोकाची कारवाई झालेल्या चार टोळ्यांमधील आरोपींवर चिखली, निगडी, शिरगाव, रावेत, चिंचवड, वाकड, देहूरोड, एमआयडीसी भोसरी, दिघी, हिंजवडी, दिघी, दापोडी, सांगवी, आळंदी, विश्रांतवाडी, खडकी, कोंढवा, उत्तमनगर पोलीस ठाण्यांत खून, दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, दंगा करून तोडफोड करणे, गंभीर दुखापत, बेकायदेशीर जमाव जमवून मारहाण करणे, अमली पदार्थ विक्री करणे, चोरी, अपहरण, शस्त्र बाळगणे असे गुन्हे दाखल आहेत.

# तळेगाव दाभाडे ते उरूळी कांचन प्रस्तावित रेल्वे मार्गाचे फेरसर्वेक्षण करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची लोकसभेत मागणी, शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे-उरूळी कांचन या प्रस्तावित बाह्यवळण रेल्वे मार्गासाठी शेतकऱ्यांची मोठी जमीन संपादित केली जाणार आहे. या मार्गाला शेतकऱ्यांचा विरोध नसून या मार्गात बदल, फेरसर्वेक्षण करण्याची त्यांची मागणी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या भावनांचा विचार करुन या मार्गाचा फेर सर्व्हे करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत केली.

तळेगाव दाभाडे ते उरुळी कांचन हा एक प्रस्तावित रेल्वे मार्ग आहे. हा मार्ग पुणे शहराच्या वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि पुणे-अहिल्यानगर नवीन मार्गाचा भाग म्हणून आणला जात आहे, मात्र या मार्गामुळे बाधित होणाऱ्या गावातील शेतकरी आणि स्थानिकांकडून याला तीव्र विरोध होत आहे. याच विरोधामुळे मार्गाच्या आखणीत बदल करण्याची मागणी केली जात आहे. हा प्रश्न खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमोर मांडला. शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेण्याची मागणी त्यांनी केली.




खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघातील तळेगाव दाभाडे ते उरूळी कांचन हा नवीन बाह्यवळण रेल्वे मार्ग तयार केला जात आहे. या मार्गाचे सर्व्हेचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गाबाबतचे नोटीफिकेश प्रसिद्ध केले आहे. मावळ, खेड, हवेली तहसील कार्यालय हद्दीतील गावांमधून हा मार्ग जाणार आहे. देहूगाव नगरपंचायत हद्दीतील विठ्ठलनगर, माळीनगर, झेंडेमळा, बोडकेवाडी, हगवणे, काळोखे मळा, सांगुर्डे, इंदोरी पुढे धानोरे, सोळू, मोई, चिंबळीमधून हा मार्ग जाणार आहे. या गावांमधील शेकडो हेक्टर जमीन संरक्षण, रेल्वे, गॅस पाईपलाईन, रिंगरोड, एमआयडीसी, पुणे-राष्ट्रीय महामार्गासाठी यापूर्वी संपादित केली आहे.

आता प्रस्तावित तळेगाव दाभाडे ते उरूळी कांचन रेल्वे मार्गासाठीही जमीन भूसंपादन करावे लागणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांचा रेल्वे मार्गाला विरोध नाही. परंतु, याचा दुसऱ्यांदा सर्व्हे करावा. रेल्वे मार्गात बदल करावा. त्यात शाळा, घरे, शेतीक्षेत्र प्रभावित होणार नाही, याची दक्षता घ्यावी अशी त्यांची मागणी आहे. त्यामुळे गावातील नागरिकांचा भावनांचा विचार करुन आवश्यक बदल करावा. प्रस्तावित रेल्वे मार्गाला शेतकऱ्यांचा विरोध नाही. शेतकऱ्यांचे नुकसान न करता बाजूने सर्व्हे करावा, असे खासदार बारणे म्हणाले.

# आचारसंहितेच्या तोंडावर जम्बो उद्घाटने

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते 3 हजार कोटींच्या कामांचा शुभारंभ; स्थायी समितीत 390 कोटींना मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुकांची घोषणा कोणत्याही क्षणी होईल. 15 डिसेंबरनंतर आचारसंहिता लागण्याची चिन्हे असून, त्यानुसार नव्या वर्षाच्या सुरुवातीला 14 किंवा 15 जानेवारी रोजी मतदान होऊ शकते. शहरात गेल्या काही दिवसांत मार्गी लागलेल्या कोट्यवधी रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन करून घेण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये चढाओढ लागली आहे. तब्बल 3 हजार कोटी रुपयांच्या विकास कामांची उद्घाटने येत्या सोमवारी (दि 15) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एकाच कार्यक्रमात होणार आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी भाजप व महापालिकेतर्फे गणेश कला क्रीडा मंच येथे सुरू आहे.

महापालिकेचे सभागृह 14 मार्च 2022 रोजी मध्यरात्री विसर्जित झाले आणि त्यानंतर निवडणुका होणे अपेक्षित होते. मात्र, या निवडणुका गेल्या साडेतीन वर्षांपासून रखडल्या आहेत. महापालिकेवर सध्या प्रशासकराज आहे. आयुक्तच प्रशासकाची भूमिका निभावत आहेत. राज्यातील इतर सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या होत्या. त्यावरील सुनावणीत 31 जानेवारी 2026 पर्यंत सर्व निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. नागपूर येथील हिवाळी अधिवेशन 14 डिसेंबरला संपताच निवडणुका जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शहरातील निवडणूकपूर्व हालचालींना जोर आला आहे

सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुण्यात येणार असून शहराच्या मध्यवर्ती भागांसह विविध उपनगरांतील प्रकल्पांचा समावेश असलेल्या तब्बल 3 हजार कोटींपेक्षा अधिक प्रकल्पांचे लोकार्पण व भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम म्हणजे भाजपचे शक्तीप्रदर्शन मानले जात आहे. गणेश कला क्रीडा मंच येथे होणाऱ्या या कार्यक्रमासाठी महापालिका प्रशासनाकडून जोरदार तयारी सुरू आहे.




### जाता जाता 390 कोटींच्या 88 प्रस्तावांना आयुक्तांची मंजुरी

» महापालिका निवडणुकीसाठी 16 डिसेंबरनंतर कधीही आचारसंहिता लागू होऊ शकते. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीपूर्वी दिवसभर विविध निविदांना मंजुरीसाठी गती देण्यासाठी शुक्रवारी धावपळ सुरू होती. सायंकाळी झालेल्या बैठकीत तब्बल 390 कोटी रुपयांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली. त्यामुळे निवडणुकीपूर्वी स्थायी समितीत कोट्यवधी रुपयांची उड्डाणे झाल्याची चर्चा रंगली. सायंकाळी पावणेसहा वाजता आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक सुरू झाली. या बैठकीत एकूण 88 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. त्यात शहरातील कचरा संकलनासाठी 340 छोट्या घंटागाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय महत्त्वाचा ठरला. यासोबत 12 संगणक आणि 11 बिन-लिफ्टर घेण्याचाही समावेश आहे. या संपूर्ण उपक्रमासाठी पुढील पाच वर्षांत 284 कोटी रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला. तसेच मेकॅनिकल ट्रान्सफरच्या पाच वर्षांच्या 22 कोटी रुपयांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली. पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत वृक्षलागवडीसाठी सुमारे 2 कोटींच्या निविदेलाही हिरवा कंदील देण्यात आला. याशिवाय इतर विविध विभागांच्या प्रस्तावांसह एकूण 88 कामांना स्थायी समितीने मंजुरी दिली.

### या कामांचे होणार उद्घाटन

» महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीतील अ आणि ब विंग, नगर रस्ता क्षेत्रीय कार्यालयाची नवी इमारत, खराडी, चांदणी चौक व बाणेर येथील अग्निशामक केंद्रे, विविध सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, आपत्ती व्यवस्थापनासाठीचे इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर, जागतिक सायकल स्पर्धेसाठी केलेले 75 किमीचे रोड नेटवर्क, समान पाणीपुरवठा योजनेतील पूर्णत्वास गेलेले 40 झोन तसेच काही दवाखाने व आरोग्य केंद्रांचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

### या कामांचे होणार भूमिपूजन

» कार्यक्रमात बिंदुमाधव ठाकरे चौकातील उड्डाणपूल व ग्रेड सेपरेटर, आचार्य आनंदऋषिजी महाराज (विद्यापीठ) चौकातील उड्डाणपुलाचे उद्घाटन तसेच ग्रेड सेपरेटरचे भूमिपूजन, पाणीपुरवठ्याचे विविध प्रकल्प आणि वडगाव येथील जलशुद्धीकरण केंद्राचे भूमिपूजन अशा सुमारे 400 ते 500 कोटी रुपयांच्या नव्या कामांची मुहूर्तमेढही रोवली जाणार आहे.

# भाजपच्या तिकीटासाठी रस्सीखेच! मुलाखतींचा धडाका; माजी नगरसेवकांचं टेन्शन वाढलं

## पुणे मनपा निवडणुकीसाठी भाजपची जोरदार तयारी; 165 जागांसाठी 2,350 इच्छुकांच्या दोन दिवसांत मुलाखती.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या संभाव्य निवडणुकीची चाहूल लागताच भाजपने उमेदवार निवड प्रक्रियेला वेग दिला आहे. पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी अर्ज सादर केलेल्या इच्छुकांच्या आज ( शनिवार्फ) तसेच उद्या ( रविवारी) मुलाखती घेतल्या जाणार आहेत. पक्षाकडे आता पर्यंत १६५ जागांसाठी सुमारे दोन हजार ३५० कार्यकर्त्यांनी निवडणूक लढविण्यासाठी अर्ज केले आहेत.

अर्ज करणाऱ्यांत माजी नगरसेवकांसह, इतर काही पक्षातील माननियांचा समावेश आहे. या अर्जांची छाननी करण्यात आली असून त्यानुसार, डीपी रस्त्यावरील शहर कार्यालयात मुलाखती घेण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक प्रमुख गणेश बिडकर यांनी दिली. शहराध्यक्षांसह पक्षाच्या कोअर कमिटीचे सदस्य यावेळी उपस्थित राहणार आहेत.

भाजपकडून काही दिवसांपूर्वी निवडणुकांसाठी अर्ज वाटप केले होते. त्यानंतर पक्षाकडे मोठया प्रमाणात अर्ज दाखल झाले आहेत. सुरूवातील पक्षाकडून ही सर्व नावांची यादी प्रदेश कार्यालयास पाठविण्यात येणार होती. मात्र, त्यानंतर अर्जांची संख्या अपेक्षेपेक्षा जास्त असल्याने पक्षाने ही नावे थेट न पाठवता,

इच्छुकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन त्यांची कामगिरी, जनसंपर्क, संघटनात्मक जबाबदाऱ्या आणि आरक्षण निकषांची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार्फ, सकाळी १० वाजेपासून मुलाखती घेतल्या जाणार असून प्रत्येक वॉडसाठी कमीत कमी तीन नावांची शिफारस केली जाणार आहे. तीनपेक्षा अधिक सक्षम उमेदवार असल्यास ही संख्या वाढविली जाणार आहे.

भाजपकडे एकूण दोन हजार ३०० अर्ज प्राप्त झाले असून त्यात प्रभाग क्रमांक २९ मध्ये सर्वाधिक ७१ अर्ज आले आहेत. प्रभाग क्रमांक २८ मध्ये ६०, तर प्रभाग क्रमांक २४ मध्ये ५८ अर्ज मिळाले आहेत. सर्वात कमी म्हणजे प्रभाग क्रमांक ६ आणि १४ मधून प्रत्येकी १५ अर्ज प्राप्त झाले आहेत. बहुतांश प्रभागांमध्ये अर्जांची संख्या ३०पेक्षा अधिक आहे.




### सर्वासमोर मुलाखत नको

» पक्षाकडून इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार असल्यातरी भाजपमध्ये जाण्यासाठी रांगेत असलेल्या इतर पक्षातील माजी नगरसेवकांची चांगलीच कोंडी झाली आहे. त्यामुळे, आमच्या मुलाखती सर्वांच्या सक्षम नको अशी भूमिका त्यांनी घेतल्याचे सांगण्यात येत आहे. राष्ट्रवादी कॉग्रेस, कॉग्रेस, शिवसेना ठाकरे पक्ष , राष्ट्रवादी कॉग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील अनेक जण भाजपच्या वाटेवर आहेत.

# कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम ऊस बिलातून कपात करू नये

## साखर संचालकांची कारखान्यांना महत्त्वपूर्ण सूचना; ऊस आयुक्तालय नामकरणानंतर आंदोलन यशस्वी

**पुणे | प्रतिनिधी**

साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावरील कर्जाची रक्कम कपात अथवा वर्ग करु नये, अशा महत्वपूर्ण सूचना साखर संचालक यशवंत गिरी यांनी शासन निर्देशांन्वये सर्व साखर कारखान्यांना दिल्या आहेत. तसेच साखर आयुक्तालयाऐवजी तेथील कोनशिलेवर आम्ही आता "ऊस आयुक्तालय" असे नामकरण करण्यात यशस्वी झाल्याने आमचे आंदोलन यशस्वी झाले आहे, अशी माहिती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी दिली.

उसाला प्रति टनास साडे सात हजार रुपये दर दयावा, साखर आयुक्तालयाच्या पहिल्या मजल्यावर असलेली साखर महासंघाची कार्यालये हटवावीत आणि साखर आयुक्तालयाऐवजी ऊस आयुक्तालय नांव करण्यासह अन्य मागण्यांसाठी शेतकरी संघटनेने पाटील यांच्या नेतत्वाखाली शुक्रवारी (दि.12) साखर आयुक्तालयावर दिवसभर आंदोलन केले. सायंकाळी पाचच्या सुमारास साखर आयुक्तालय कोनशिलेवर ऊस आयुक्त कार्यालय असे बॅनरद्वारे नामकरण करण्यावरुन शेतकरी आणि पोलिसात झटापट झाली. पोलिसांची जादा कुमकही मागविण्यात आली होती. मात्र, वादानंतर शांततामय मार्गाने बॅनर लावण्याची भुमिका शेतकऱ्यांनी घेतली आणि अखेर फलक लावताच आनंदोत्सव साजरा केला. त्यानंतर पाटील पत्रकारांशी बोलत होते.

हुतात्मा बाबू गेनू आणि शेतकऱ्यांचे नेते कै. शरद जोशी यांच्या 12 डिसेंबरच्या स्मृतिदिनानिमित्त साखर आयुक्त कार्यालयाचे नांव बदलून ऊस आयुक्तालय करण्याची मागणी पाटील यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्र्यांकडे यापुर्वीच केली होती. अन्यथः आम्हीच ते नांव बदलू अशी भुमिका घेऊन आंदोलन केले. यावेळी पाटील यांच्यासह शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, क्रांतिसिह नाना पाटील ब्रिगेडचे अध्यक्ष शिवाजी नांदखिले, शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष लक्ष्मण वडले, शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष पाडुंरग रायते, कोल्हापूरचे शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष माणिकराव शिंदे, पुणे जिल्हा शेतकरी संघटनेच्या आरटीआय आघाडीचे अध्यक्ष दिपक पवार, अहिल्यानगरचे शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अनिल औताडे, जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ तुवर, अॅड. अजित काळे, युवा शेतकरी तालुका आघाडीचे अध्यक्ष संजय मोकाटे, वैजापूर तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविंद्र पवार, महिला शेतकरी संघटनेच्या राज्य अध्यक्ष डॉ. प्रगती चव्हाण-खरे आदींसह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी प्रति टनास दोन रुपये देणगी देऊन साखर आयुक्तालयाची इमारत उभी राहिली. साखर कारखानदारांच्या दबावाखाली येथे काम चालते. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ व खाजगी कारखानदारांनी आयुक्तालयाचा एक मजला ताब्यात ठेवला आहे. तो आता आम्ही खाली केल्याशिवाय गप्प बसणार नाही.



### शेतकरी संघटनेने केलेल्या विविध मागण्या

- दोन साखर कारखान्यातील हवाई अंतराची अट रद्द करा.
- ऊसाला प्रति टन साडे सात हजार रुपये द्या.
- थकीत एफआरपी तातडीने द्यावी
- गाईच्या एक लिटर दुधाला एक लिटर डिझेल एवढा तर म्हशीच्या एक लिटर दुधाला एक लिटर प्रेट्रोल एवढा मिळाला पाहिजे.
- सर्व शेतकऱ्यांना वीजमुक्ती, कर्जमुक्ती करा.
- शिवार बंदी असलेला वन्य प्राणी संरक्षण कायदा रद्द करा.
- अत्यावश्यक वस्तू कायदा, भूसंपादनाचे कायदे, सिलिंगचे कायदे यासह सर्व शेतकरी विरोधी कायदे रद्द करा.
- गोवंश हत्या बंदी कायदा रद्द करा.

### गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळाचे 10 रुपये बंद करा

ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी महामंडळासाठी प्रति टन 10 रुपयांची कपात केली जाते. ही रक्कम कपात करणे बंद करण्याचा ठराव यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील ब्रिगेडचे अध्यक्ष शिवाजी नांदखिले यांनी मांडला आणि त्यास सर्व शेतकऱ्यांनी हात उंचावून व शेतकरी एकजुटीचा विजय असो, अशी जोरदार घोषणाबाजी करीत एकमुखाने मंजूर केला. तशा सूचना साखर आयुक्तांनी कारखान्यांना देण्याची सूचना रघुनाथदादा पाटील यांनी यावेळी बोलताना केली. दरम्यान, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी लोकप्रतिनीधी म्हणून आमदारांची असून त्यांनी यामध्ये सकारात्मक भुमिका न घेतल्यास आमदाराना गावबंदी करण्याचा इशारा यावेळी बोलताना लक्ष्मण वडले यांनी दिला आणि त्यास टाळ्या वाजवून शेतकऱ्यांनी दाद दिली.

# कोरेगाव भीमासाठी प्रशासनाचा 'मेगा प्लॅन' तयार; वाचा सविस्तर नियोजन

## कोरेगाव भीमा अभिवादन कार्यक्रमाचे नियोजन सुरु; सर्व संघटनांना विश्वासात घेऊन सोयीसुविधा द्या, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा (ता. शिरुर) सह पेरणे फाटा येथे एक जानेवारी २०२६ रोजी होणारा विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रम शासकीय यंत्रणानी सर्व संघटनांना विश्वासात घेवून यशस्वी करावा आणि कार्यक्रमास येणाऱ्या अनुयायींची गैरसोय होणार नाही, या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने नियोजन करावे, असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

एक जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित होणाऱ्या करण्यात आली होती. याप्रसंगी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे,

पुणे शहर पोलीस उपायुक्त सोमय मुंढे, पुणे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे, हिम्मत जाधव, समाज कल्याण उपायुक्त वंदना कोचुरे, सहाय्यक आयुक्त तथा बार्टीचे निबंधक विशाल लोंढे यांसह अधिकारी व विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

विजस्तंभास अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना पिण्याचे व वापराचे पाणी, स्वच्छतागृह, वाहनतळ, दिशादर्शक फलके, वाहतूक व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, औषधोपचार, ड्रोन, सीसीटीव्ही, पुस्तकालय आदी सुविधा उपलब्ध करून देणार असून अनुयायींची कोणतीही गैरसोय होणार नाही याची जिल्हा प्रशासन दक्षता घेत आहे.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने येणाऱ्या सूचनांचा नियोजनात समावेश करण्यात येईल. आरोग्याच्या प्रश्नासंबंधी आरोग्य विभागाने नियोजन करावे, पाणी पुरवठ्यासाठी पर्यवेक्षकाची नेमणूक करावी, गरोदर महिला, लहान मुले व वयोवृद्ध महिलांसाठी स्वतंत्र रांगेचे प्रशासनाने नियोजन करावे, विजयस्तंभ नियोजन आराखडाचा अभ्यास करुन तफावत असल्यास सुधारणा कराव्यात, यासह विविध सुचना केल्या.



> बैठकीत विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी उपयुक्त सूचना मांडल्या असून त्या सूचनांचा आदर ठेऊन अंमलबजावणी केली जाईल तसेच संघटनांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरिता सहकार्य करावे.
>
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी.